गेल्या काही काळात अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु झाल्या आहेत.प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाला व्यावसायिक व धंदेवाईक स्वरुप यायला लागले आहे.त्याचा परिणाम मराठी माध्यमाच्या शाळांवर होवुन मराठी शाळा, शिक्षक, शिक्षणसंस्था यांच्यामध्ये एक प्रकारची मरगळ व निराशाजनक अशी वातारवरणनिर्मिती झाली आहे.मराठी शाळातील पटसंख्या कमी व्हायला लागल्या आहेत,काही मराठी शाळा बंद पडायला लागल्या आहेत.कालांतराने मराठी भाषेचा —हास होवून महाराष्ट्र अमराठी होतो की काय अशी भीती मनात निर्माण होते.

पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळाकडे ओढा का आहे ? स्पर्धापरिक्षा,नोकरी, आयटीक्षेत्र, संशोधनक्षेत्र इ.मध्ये मुलांना फायदा होईल,जागतिकीकरणामुळे आपली मुले मागे राहु नये,नोकरीसाठी उपयुक्त असे अनेक समज/गैरसमज इंग्रजी माध्यमाबाबत पालकांमध्ये आहेत. इंग्रजी माध्यमातील शिक्षणाबाबत असलेले समज खरोखरच योग्य आहेत का! यासाठी संशोधनक्षेत्र, प्रशासन, समाजकारण,राजकारण इ.क्षेत्रातील यशस्वी व्यक्ती कोणत्या माध्यमात शिकले हे जाणुन घेणे योग्य ठरेल. थोर शास्त्रज्ञ अब्दुल कलाम,अनिल काकोडकर इ.मातृभाषेतुनच शिकले.जेष्ठ सनदी अधिकारी भुषण गगराणी,वरिष्ठ पोलीस अधिकारी नांगरे पाटील इ. मराठी माध्यमातुनच शिकले.बरेचसे पालक मातृभाषा मराठी माध्यमातच शिकलेले असुन व मराठी माध्यमात शिकल्यामुळे कुठे काही अडले नसल्याची वस्तुस्थिती असुनसुध्दा केवळ अनुकरणाच्या प्रवृत्तीमुळे इंग्रजी माध्यमाची निवड करतात.

अमेरिका,फ्रान्स,जर्मनी,जपान,चीन,रशिया या जगातील सर्वात जास्त प्रगत देशामध्ये त्यांच्याच भाषेत शिक्षण,संशोधन व व्यवहार होतात. जपान,इस्त्रायल,चीन,कोरीया या देशांनी गेल्या काही दशकांमध्ये उच्चप्रतीची प्रगती साधली हि त्यांच्याच भाषेच्या माध्यमातुन! आख्या युरोप खंडामध्ये फक्त इंग्लंड व आर्यलंड या दोनच देशात इंग्रजी भाषा आहे. मात्र इंग्रजी साम्राज्य व इंग्रजी शिक्षणव्यवस्था यामुळे आम्हा भारतीयांच्या मानगुटीवर इंग्रजीचे भुत एवढे घटट बसले आहे की इंग्रजी हिच विश्वभाषा आहे व इंग्रजीमुळेच प्रगती होते हा भ्रम भारतीयांमध्ये पसरला आहे. त्यामुळे याबाबत वस्तुस्थिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे.

मातृभाषा मराठी व इंग्रजी माध्यमातील मुलांनी प्राप्त केलेले ज्ञान, शैक्षणिक व सामाजिक संस्थांनी शालेय शिक्षणाबाबत केलेले संशोधन व पहाणी यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता मातृभाषा मराठी माध्यमातील शिक्षण हे उच्च दर्जाचे, मुलांना सहज आत्मसात होणारे, कमी खर्चिक, देशाच्या माती/संस्कृतीशी निगडीत असणारे म्हणजेच अधिक उपयुक्त आढळून आले आहे.

मातृभाषा मराठी माध्यमातल्या शिक्षणाच्या उपयुक्ततेबाबतचा संदेश जनमानसामध्ये विशेषत: लहान अपत्ये असलेल्या पालकांपर्यत पोहचवणे अत्यंत आवश्यक आहे. सोबत ‘शालेय शिक्षणात मातृभाषा मराठी माध्यमाचे महत्व’ हे माहितीपत्रक जोडले आहे. यातील मजकुराशी आपण नक्कीच सहमत असाल याची मी खात्री बाळगतो.

मातृभाषेच्या माध्यमातील शिक्षणाच्या उपयुक्ततेबाबतचे माहितीपत्रक हे आपल्या परिसरातील रहिवाशी, नातेवाईक (विशेषत: १ ते ६ वयाचे अपत्ये असलेल्या पालक) यांच्यापर्यंत पोहचवावे हि नम्र विनंती.

चला ! मातृभाषा मराठी माध्यमातल्या शिक्षणाच्या उपयुक्ततेबाबतचा संदेश जनमानसामध्ये पोहचवण्यासाठी प्रभावी चळवळ सुरु करु या व मराठी शाळा, मराठी भाषा व महाराष्ट्र अमराठी होण्यापासुन वाचवू या !!

आपला मातृभाषाशिक्षणप्रेमी

# शालेय शिक्षणात मातृभाषा मराठी माध्यमाचे महत्व

सध्या आपल्या पाल्यांना मातृभाषेच्या माध्यमात म्हणजे मराठी माध्यमात शिक्षण न देता इंग्रजी माध्यमातच शिक्षण देण्याचा पालकांचा फारच कल वाढला आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा आकर्षकपणा,मोठया जाहिराती, इंग्रजी साम्राज्य व इंग्रजी शिक्षणव्यवस्थेमुळे भारतीयांवर इंग्रजी भाषेचा असलेला पगडा, इंग्रजीला आलेले अवास्तव महत्व याचा पालकांवर फार प्रभाव पडला आहे. मराठी व इंग्रजी माध्यमातील मुलांनी प्राप्त केलेले ज्ञान, शैक्षणिक व सामाजिक संस्थांनी केलेले संशोधन व पहाणी यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता मराठी माध्यमातील शिक्षण हे उच्च दर्जाचे, मुलाना सहज आत्मसात होणारे, कमी खर्चिक, देशाच्या माती व संस्कृतीशी निगडीत असणारे आढळुन आले आहे. यास्तव आकर्षक, खर्चिक इंग्रजी माध्यमातील वरवरच्या शिक्षणापेक्षा मातृभाषा मराठी माध्यमातील शिक्षणालाच पालकांनी प्राधान्य दयावे.

- **मातृभाषेतील शिक्षण– गुणवत्तापुर्ण शिक्षण**

युनेस्को ही संयुक्त राष्ट्रसंघ (युनो) या जागतिक संघटनेची शिक्षणविषयी कार्य करणारी उपसंघटना आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनामध्ये मातृभाषेच्या माध्यमातुन शिक्षण घेतलेल्या मुलांची आकलनशक्ती व गुणवत्ता हि इतर भाषेच्या माध्यमातुन शिक्षण घेतलेल्या मुलांपेक्षा चांगली व जास्त असल्याचे आढळुन आले आहे.

- **मातृभाषेतुन शिक्षण – प्रगतीचे दयोतक**

जगातील प्रगत देशांचा आढावा घेतल्यास त्यांच्या व्यवहार व शिक्षणाचे माध्यम त्यांच्या मातृभाषाच असलयाचे दिसून येते. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, जपान, चीन, रशिया हे जगात सर्वात जास्त प्रगत देश आहेत व त्यांच्या व्यवहार/शिक्षणाचे माध्यम त्यांच्या मातृभाषाच आहेत !

- **शालेय शिक्षणाचे माध्यम – मातृभाषाच** !

इंग्रजी अथवा इतर भाषा शिकणे नक्कीच चांगले आहे परंतु मातृभाषेऐवजी इंग्रजी शिक्षणाचे माध्यम म्हणुन स्विकारणे अत्यंत घातक व चुकीचे आहे. याचे साधे व सोपे उदाहरण म्हणजे एखादया मुलाला एखादी गोष्ट/माहिती मातृभाषेत सांगितली तर त्याला चांगली समजेल व आत्मसात होईल व तो इतरांकडे सहज व्यक्त करु शकेल. मात्र तीच गोष्ट/माहिती इंग्लीशमधून सांगितल्यास त्याला समजण्यास वेळ लागेल,त्याला अधिकवेळा सागितल्यावर लक्षात येईल व आत्मसात होईल. ती गोष्ट/माहिती त्याला इतरांकडे व्यक्त करताना त्यात सहजसुलभता नसेल. यावरुन मातृभाषेच्या माध्यमाची उपयुक्तता व महत्व स्पष्ट होते. पालकांनो, आपल्या मुलांना इंग्रजी भाषा म्हणुन जरुर शिकवा पण मुलांच्या शालेय शिक्षणासाठी मातृभाषा मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाची निवड करणे म्हणजे मुलांवर शैक्षणिक अन्याय करण्यासारखे आहे !

- **मातृभाषेतील शिक्षण – उच्च दर्जाचे व उपयुक्त शिक्षण**

मातृभाषेतील शिक्षण हे सहजसुलभ,सहज आत्मसात होणारे असते व थेट हृदयापर्यत भिडणारे असते हे आता जगमान्य झाले आहे.अन्य भाषेतून घेतले जाणारे शिक्षण हे फक्त मेंदुपर्यत व वरचेवर रहाते.आपली विचारप्रक्रिया हि मुलत: मातृभाषेत होत असते. आपली वैचारिक जडणघडण हि स्वाभाविकपणे मातृभाषेत सहजपणे होत असते. म्हणुन मातृभाषेतील शिक्षण उच्च दर्जाचे व अत्यंत उपयुक्त आहे.

- **मराठी माध्यमाबाबत गैरसमज व वस्तुस्थिती**

मराठी माध्यमातून शिक्षण घेतले तर उच्च शिक्षणात इंग्रजीतून अभ्यास जमणार नाही हा मोठा गैरसमज आहे. उलट मुलांना शालेय शिक्षणामध्ये इंग्रजी नीट समजत नाही. विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करणे, नवनवीन कल्पना आत्मसात करुन प्रकट करणे हे फार अवघड जाते.परिमाणत: शिक्षकानी लिहून दिलेल्या टिपणांवर व सोप्या भाषेत थोडक्यात लिहलेल्या उत्तरांच्या घोकंपटटीवर

त्यांची सर्व मदार अवलंबून असते.विदयार्थी ज्ञानार्थी न बनता परिक्षार्थी बनतात. अर्थपुर्ण आकलनाचा अभाव,अपुर्ण ज्ञान,अस्पष्ट संबोध यामुळे पुढे उच्च शिक्षणात ते कमी पडतात.

- **मातृभाषेतील शिक्षण – स्थानिक परिस्थिती व मातीशी निगडीत**

मराठी माध्यमामध्ये ''येरे येरे पावसा'' ही कविता आहे. तर इंग्रजी माध्यमामध्ये " Rain go away away" ही कविता आहे. हया दोन्ही कविता आपआपल्या देशांच्या परिस्थितीशी व मातीशी निगडीत आहेत. इंग्रजी माध्यमातील शिक्षणामुळे मुलांची स्थानिक परिस्थिती व मातीशी नाळ कमी होते. इंग्रजी माध्यमातील काही शिक्षक इतिहासाच्या पुस्तकातील 'मावळे' या शब्दाचा उच्चार 'मवालीज्' करतात. स्थानिक लेखक, योध्दे,क्रांतीकारक,संत, ठिकाणे,वस्तु इ.अनेक बाबीचा इंग्रजी माध्यमातील विदयार्थ्यासमोर वेगळेच अपभ्रंश येतात. त्यामुळे स्थनिक बाबी/परिस्थितीबाबत विदयार्थ्यांर्ची माहिती/ज्ञान परिपूर्ण होत नाहीत.

- **मातृभाषेतील शिक्षण – विदयार्थ्याना परिपूर्ण ज्ञान**

दहावी बोर्डाच्या परिक्षेचे दोन्ही माध्यमांच्या विदयार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणा—या शिक्षकांना मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विदयार्थ्याच्या ज्ञानाबाबत अभिप्राय विचारला असता माहिती प्राप्त झाली की मराठी माध्यमातील विदयार्थी उत्तरे सविस्तर व विस्तृत लिहतात तर इंग्रजी माध्यमातील बहुतांश विदयार्थी आपली उत्तरे व्यवस्थित व परिपूर्ण लिहण्यात कमी पडतात .

- **भारत देश – भाषिक गुलाम ?**

दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले व इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाची मुक्तता झाली. त्या काळात जगातील जवळजवळ ७१ देशांची परकियांच्या गुलामगिरीतुन सुटका झाली. बहुतेक देशांनी परकिय भाषाचा वापर सोडून आपआपल्या भाषांचा स्वीकार केला व देशाची प्रगती साधली उदा. जपान, क्युबा, चीन, मलेशिया, ब्राजिल, इंडोनेशिया, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे इ. भारतामध्ये मात्र इंग्रजीचाच वापर चालू राहिला व गुलामी प्रवृत्तीमुळे इंग्रजीलाच महत्व मिळु लागले. आजमितीला देशाला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ ६९ वर्ष झाली आहेत. मात्र इंग्रजीचा वापर व महत्व कमी न होता वाढतच आहे. त्यामुळे देशाला मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे केवळ राजकिय गुलामी सपंली पण भाषिक गुलामी अजुनहि चालु आहे असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. पालकांनो, मुलांच्या शिक्षणामध्ये इंग्रजी माध्यमाला प्राधान्य देवुन आपण आपल्या मुलांच्या प्रगतीला बाधा आणत नाहीत ना ! भावी पिढीची गुलामी प्रवृत्ती वाढवत तर नाही ना !!

- **धक्कादायक निष्कर्ष १**

माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यानी केलेल्या संशोधनामध्ये माध्यमिक शिक्षणामध्ये मराठी व इंग्रजी माध्यम असलेली मुले यांच्या महाविदयालयीन काळातील विज्ञान विषयातील प्रगतीचा तुलनात्मक आढावा घेण्यात आला. या संशोधनामध्ये माध्यमिक शाळेत मराठी माध्यम घेतलेल्या मुलांनी इंग्रजी माध्यमातल्या मुलांपेक्षा अधिक प्रगती केल्याचे आढळुन आले.

- **धक्कादायक निष्कर्ष २**

एका सामाजिक संस्थेतर्फे मुबंई, कलकत्ता,चेन्नई, दिल्ली येथिल नामांकित १४२ शाळातील ३२ हजार मुलांची एक चाचणी घेण्यात आली. सर्व विदयार्थी इंग्रजी माध्यमातील पाचवी ते सातवी मधील होते.सदर चाचणीमध्ये निष्कर्ष निघाला की विदयार्थ्याचे विषयज्ञान वरवरचे असून ते केवळ पाठातंरावर अवलबुन आहेत व त्याच्या अभिव्यक्तीतही त्रोटकपणा आहे.

- **देश –मातृभाषा–संस्कृती**

देश भुगोलाने तयार होतो,पण राष्ट्र भाषेतुनच साकारते हे एक मोठे सत्य आहे. भाषेमागे संस्कृती असते.भाषा नष्ट झाली की संस्कृतीही नष्ट होते. जगातली अनेक उदाहरणे याला साक्षी आहेत. म्हणूनच थोर कवी कुसुमाग्रजांनी 'स्वातंत्रदेवीची विनवणी' या गाजलेल्या कवितेत म्हंटले आहे **'भाषा मरता,देशही मरतो,संस्कृतीचाही दिवा विझे,**
**गुलाम आणिक होवून आपुल्या प्रगतिचे शिर कापु नका''** .

- **जीवन–संस्कार–मातृभाषा**

मुलांचे जीवन चांगल्याप्रकारे घडविण्यासाठी केवळ आकर्षक व जास्त शुल्क असलेले इंग्रजी माध्यमातील शिक्षण आवश्यक नाही तर मानवी जीवनात येणा–या व्यावहारिक, व्यावसायिक,कौटुबिक समस्या व प्रसंग यांना तोंड देण्यासाठी त्याच्यावर योंग्य ते संस्कार करणेसुध्दा अत्यंत आवश्यक असते. मुलांवर मातृभाषेतून व मातृभाषेतील शिक्षणातूनच संस्कार अंत्यत प्रभावीपणे होतात.

- **चांगले शिक्षण हि फक्त श्रीमंताची / धनधांडग्याची मक्तेदारी नाही.**

सध्या शालेय शिक्षणावर दृष्टीक्षेप टाकल्यास शिक्षणाचे व्यवसायीकरण होत असल्याचे जाणवते.इंग्रजी माध्यमाच्या मोठया व आकर्षक शाळा काढुन,मोठया जाहिराती देवून मोठे प्रवेशशुल्क घेतले जाते व शैक्षणिक वर्षात वेगवेगळया कारणासांठी पालकाकडून अवास्तव शुल्क आकारले जाते.पालक या व्यवसायीकरणाला बळी पडत आहेत. पालकांनो, चांगले शिक्षण हि काही फक्त श्रीमंताची/ धनधांडग्याची मक्तेदारी नाही. आकर्षक व जास्त शुल्क असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच मुलांना चांगले शिक्षण मिळेल हा एक गैरसमज आहे. मातृभाषेच्या माध्यमातुन शिकूनसुध्दा अनेक विदयार्थी उच्चपदावर गेले आहेत व त्यांनी नाव कमावले आहे.

- **शालेय शिक्षण मातृभाषेतूनच झाले पाहिजे**

'' मातृभाषेतील शिक्षणामुळे विदयार्थ्याची आकलनशक्ती वाढते.विषयाची समज येते आणि शिकलेले पूर्ण आत्मसात होते.इकतेच नव्हे तर त्यांच्या चौकस बुध्दी व सृजनशीलतेला वाव मिळतो.येणारे युग घोकंपटटी किंवा पुस्तकी पांडीत्याचे नसुन सृजनशीलतेचे आहे.तेव्हा इंग्रजी माध्यमातुन परिक्षेपुरते जुजबी ज्ञान मिळवणारे ठोकळे मागे पडतील.अर्थात इंग्रजी चांगले बोलता येणे हे आवश्यक आहे. त्यामुळे इग्रंजी बोलायला शिका त्यामुळे परप्रांतात व परदेशात अडचण येणार नाही.मात्र मातृभाषेच्या माध्यमातुनच शालेय शिक्षण घ्या.''

**– श्री.अरुण फिरोदीया ,प्रसिध्द उदयोगपती व जागतिक मराठी संमेलनाचे अध्यक्ष**

- **फॅशन म्हणुन मुलांना इंग्रजी माध्यमात घालु नका**

'' मातृभाषाच मुलाच्या शिक्षणाचे स्वाभाविक माध्यम असुन त्याच भाषेतुन त्याचा सर्वागीण विकास होवू शकतो. त्यामुळे मुलांचे शालेय शिक्षण मातृभाषेतुनच झाले पाहीजे. केवळ फॅशन म्हणुन पालकांनी मुलांना इंग्रजी माध्यमात घालु नये '' **– जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर**

- **''परकी माध्यमाचे शिक्षण बालकांसाठी अयोग्य ''– महात्मा गांधी**

'' परकी माध्यमामुळं बालकाचा मेंदु थकतो आणि बुध्दीला मांदय येते. त्यामुळं ती केवळ घोकंपटटी व पोपटपंची करतात. परिणामी मूलभूत विचार व संशोधन याकरिता ते अपात्र बनतात. आपल्या ज्ञानाचा लाभ ते समाजाला किंवा कुटुंबाला देवु शकत नाहीत. जर मी हुकूमशहा असतो तर परकिय माध्यमातून होणारे बालकांचे शिक्षण आजच थांबवले असते' असे 'यंग इंडीया' च्या १ सप्टेंबर १९२१ च्या अंकात महात्मा गांधीनी म्हंटले आहे.

- **इंग्रजी भाषेबददलचे गैरसमज १ – इंग्रजी ही विश्वभाषा**

इंग्रजी भाषेबददल अनेक गैरसमज तमाम भारतीयामध्ये आहेत एक मोठा गैरसमज म्हणजे इंग्रजी विश्वभाषा भाषा आहे. परतु इंग्रजी ही विश्वभाषा भाषा नसुन ती इंग्रजानी राज्य केलेल्या/ इंग्रजाचे पुर्वी गुलाम असलेलया काही देशांतील भाषा आहे.जगाची लोकसंख्या व देशांची संख्या लक्षात घेता जगातील अंदाजे १० टक्के लोक व १० टक्के देश माध्यम म्हणून इंग्रजीचा वापर करतात असे स्पष्ट दिसते.

- **इंग्रजी भाषेबददलचे गैरसमज २ – इंग्रजी हि विज्ञान,तंत्रज्ञानाची भाषा**

इंग्रजी हि विज्ञान,तंत्रज्ञान व आधुनिक विज्ञानाची भाषा असल्याचा गैरसमजसुध्दा तमाम भारतीयामध्ये आहे. परतु नीट पहाणी केली असता रशियन,जर्मन व फ्रेंच व इतर देशातील शास्त्रज्ञांनीच बहुतांशी शोध लावल्याचे व संशोधन केल्याचे दिसुन येते.अनेक शोधनिबंध हे

रशियन,जर्मन व फ्रेंच व इतर भाषेतच प्रसिध्द झाले आहेत.परंतु नविन शोध व शोधनिबंधाचे साहित्य हे इंग्रजीमध्ये भारतीयांसमोर आल्याने इंग्रजी हिच विज्ञान,तंत्रज्ञान व आधुनिक विज्ञानाची भाषा असल्याचा गैरसमज भारतीयामध्ये निर्माण झाला आहे.

- **इंग्रजी भाषेबददलचे गैरसमज ३ — जागतिकीकरणामुळे प्रगतीसाठी आवश्यक भाषा**

काही लोकांचा असा समज आहे की जागतिकीकरणामुळे प्रगतीसाठी इंग्रजी उपयुक्त आहे. परंतु हा समज साफ चुकीचा आहे. याबाबत चीनचे उदाहरण उदबोधक आहे. तीन चार दशकापुर्वी चीनची ओळख ही जगातील सर्वात मोठया लोकसंख्येचा तसेच गरीबी व बेकारीने ग्रासलेला देश अशी होती. मात्र चीनने केलेल्या विलक्षण प्रगतीमुळे चीनचा आता प्रगत देशात समावेश होत आहे व अमेरिकेलासुध्दा चीनची दखल घ्यावी लागत आहे. चीनच्या विलक्षण प्रगतीसाठी इंग्रजी अथवा इतर कोणत्याही परकिय भाषेच्या कुबडयांची अथवा मदतीची गरज भासली नाही.

- **इंग्रजीबाबत गैरसमज ४ — इंग्रजीमध्ये बोलणारा प्रतिष्ठीत,स्मार्ट व हुशार**

इंग्रजीत बोलणे तमाम भारतीयांमध्ये प्रतिष्ठेचे व हुशारीचे लक्षण समजले जाते. काही लोक दुस—यांवर प्रभाव पाडण्यासाठी बोलण्यामध्ये जाणुनबुजुन इंग्रजी वाक्ये,इंग्रजी शब्द यांचा सर्रास वापर करतात. मोठया शहरातील उच्चवर्गीय लोक,महिला यांच्यातर घरातसुध्दा इंग्रजीचा संभाषणात वापर करुन इतरांपेक्षा पुढारलेले व हुशार असल्याचे भासवण्याची विचित्र मानसिकता निर्माण झाली आहे. स्वत:च्याच मातृभाषेत अथवा राष्ट्रभाषेत बोलण्याचे कमी समजुन परकी भाषेचा संभाषणात वापर करण्याची हि प्रवृत्ती नक्कीच लाजीरवाणी आहे! इंग्रजी अथवा कोणतीही भाषा बोलता येणे चांगली बाब आहे,परंतु ते हुशारीचे लक्षण नक्कीच नाही मुंबई अथवा मोठया शहरांमध्ये विमानतळावरील टॅक्सीचालक/रिक्षाचालक,परदेशी नागरिकाचा वावर असलेल्या हॉटेल्स मधील व्दारपाल,वेटर हे सुध्दा सरावाने सहज इंग्रजी बोलतात.पालकांनो! मुलाना भाषा म्हणुन इंग्रजी अवश्य शिकवा, पण इंग्रजी माध्यमातील शाळेत गेल्यावर मुलगा इंग्रजी बोलायला लागला म्हणजे हुशार झाला हया चुकीच्या समजुतीला बळी पडु नका !!

- **इंग्रजी माध्यमातील शिक्षण — खर्चिक शिक्षण**

इंग्रजी माध्यमातील शाळेत प्रवेश घेण्यापासून खर्च चालु होतो.प्रवेश घेतलयावर फोटो, आयकार्ड,गणवेष,शुज, स्कुलबस, टयुशन इ.खर्च चालु होतो. शालेय वर्षात निरनिराळे प्रोजेक्ट, त्यासाठी लागणा—या वस्तु यामुळे मासिक शिक्षणाचा खर्च चार आकडयाच्यावर जातो.शाळेत आवश्यक असणा—या काहि वस्तु ठराविक दुकानातुनच घ्याव्यात याबाबत शाळेच्या स्पष्ट सुचना असतात.दुकानदार,बसमालक,फोटोग्राफर इ. यांच्याशी शाळा प्रशासनाचे हितसंबंध असतात.या व्यापारीकरणामुळे शालेय शिक्षणाचा व्यवसाय झाला आहे.पालकांचे मात्र त्यामुळे आर्थिक शोषण होत आहे.

- **इंग्रजी माध्यमातील शिक्षण — मातृभाषेबददल कमीपणाची प्रवृत्ती**

इंग्रजी माध्यमातील शाळेत संवाद हा इंग्रजी/हिंदीमध्ये होतो. इंग्रजी चांगले यावे म्हणुन विदयार्थ्यांना संवादामध्ये मातृभाषेचा वापर न करण्याबाबत स्पष्ट सुचना असतात. मुले एकमेकांशी संवाद साधताना इंग्रजी किंवा हिंदीचा वापर करतात. विदयार्थ्यांना त्यामुळे मातृभाषा बोलणे किंवा मातृभाषेत इतराशी संवाद साधणे कमीपणाचे वाटते व मातृभाषेबददलची आपुलकी/आस्था कमी होते.हिच परिस्थिती धार्मिक बाबी,परंपरा,वेशभुषा इ. बाबत सुध्दा होते.म्हणजे इंग्रजी माध्यमातील विदयार्थ्यांची आपल्या धार्मिक बाबी,सण,उत्सव,परंपरा,वेशभुषा याबददल आपुलकी/आस्था कमी होत असल्याने त्यांचे पालन करण्याकडे कल कमी होतो.

- **प्ले ग्रुप व नर्सरीचे वाढते प्रस्थ** –

सध्या शहरी भागात गल्लोगल्ली प्ले ग्रुप व नर्सरी सुरु झाले आहेत.पध्दतशीर व आकर्षक जाहिराती याचा पालकावर प्रभाव पाडून काहि ठिकाणीतर दुकानाएवढया जागेत प्ले ग्रुप व नर्सरी सुरु झाल्या आहेत व त्यासाठी हजारो रूपयाची फी घेतली जाते.आईवडील दोघेही नोकरी करत असलेल्या दांपत्यांचे वाढलेले प्रमाण, विभक्त कुटुंब पध्दती, पालकांचा वाढलेला आर्थिक दर्जा,

मुलांना घरात ठेवण्यापेक्षा शाळेत टाकलेले बरे हि पालकांची मानसिकता यामुळे पालक प्ले गुप व नर्सरीकडे वळत आहे.शालेय शिक्षणात ज्युनियर के.जी.,सिनियर के.जी. चे वर्ग इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हे पहिलीअगोदर होते.परंतु आता प्ले गुप व नर्सरी सुरु झाल्याने मुले वयाच्या २ ते अडीच वर्षापासुनच शाळेत जायला लागली आहेत.काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी तर प्रवेशासाठी प्ले गुप व नर्सरी शिक्षण आवश्यक असल्याची अट लागु केली आहेत. काही मुले ज्युनियर के.जी. पासुनच टयुशनला जायला लागली आहेत. शाळेत शिकवलेले समजत नाही म्हणुन टयुशन लावायची,तिथे शिकवलेले आत्मसात होत नाही म्हणुन घरी अभ्यास घ्यायचा व त्यातुन अपेक्षित परिणाम होत नाही म्हणुन काही माताभगिनी तणावग्रस्त होत आहेत. बालमानसतज्ञांच्या मते शालेय शिक्षण हे वयाच्या ४—६ वर्षापासुन म्हणजे बालवाडी—पहिली असे सुरु झाले पाहिजे. मात्र प्ले गुप व नर्सरी मुळे वयाच्या २ ते अडीच वर्षापासुनच शाळेत जायला लागल्याने बालशिक्षणाचा नवीन व्यवसाय सुरु झाला आहे. यामुळे मुलांचे बालपण व खेळणे—बागडणे कमी झाले की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.पालकांनो,मुलांना योग्य वयात शाळेत पाठवा व सहज आत्मसात होणा—या मातृभाषा मराठी माध्यमातच शालेय शिक्षण दया !

- **इंग्रजी माध्यमाची निवड — योग्यता की केवळ अनुकरण**

समाज हा अनुकरणीय आहे.प्रत्येक व्यक्ती मित्र,नातेवाईक,आसपासचे रहिवासी व आपल्यापेक्षा पद,व्यवसाय,सामाजिक,आर्थिक इत्यादीने मोठया असलेल्या व्यक्तींच्या वेशभुषा, रितीतिवाज, खानपान, शिक्षण इ.बाबतीत अनुकरण करत असतो. सध्यातर समाजजीवनावर जाहिरातक्षेत्राचा फार मोठा प्रभाव आहे. जाहिरातीमध्ये असलेल्या प्रत्येक बाबी हया योग्य असतीलच असे नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्ती अनुकरण करत असलेल्या बाबी हया योग्य असतातच असे नाही. मुलांच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाची निवड करताना मातृभाषा योग्य की इंग्रजी योग्य हया बाबीचा विचार केला जात नाही. केवळ इतरांची मुले इंग्रजी माध्यमात जातात म्हणुन इंग्रजी माध्यमाची पालकांकडुन निवड केली जाते. पालकांनो इतरांचे केवळ अनुकरण न करता मुलांच्या शालेय शिक्षणासाठी योग्य व उपयुक्त असलेल्या मातृभाषेच्या माध्यमाचीच निवड करा !

- **सीबीएसई शाळांचे पेव**

सध्या सीबीएसई/आयसीएसई शाळांचे पेव फुटले आहे. आकर्षक शाळा,मोठया व पध्दतशीर जाहिराती,काही शाळांची पाच आकडी फी पाहिल्यावर पालक केवळ अनुकरणाच्या प्रवुत्तीला बळी पडल्याचे वाटते व सीबीएसई अभ्यासक्रमाचा आढावा घेतल्यावर पालकांनी सीबीएसई पाठयक्रम शिक्षण योग्य की अयोग्य हा विचार केला नसावा याची जाणीव होते.

सीबीएसई पाठयक्रमामध्ये इंग्रजी व हिंदी या प्रथम भाषा शिकवल्या जातात. मात्र मातृभाषा मराठी ही ठराविक शाळात व तीसुध्दा सोयीप्रमाणे शिकवली जाते. काही शाळेत फक्त ५ ते ८ वी शिकवली जाते. काही शाळेत तिसरीपासुन शिकवली जाते. शिकवण्यात येणा—या मराठीचा अभ्यासक्रम वेगवेगळा व दुय्यम दर्जाचा म्हणजे अमराठी भाषिकांसाठी उपयुक्त असा आहे.त्यामुळे सीबीएसई पाठयक्रम शिकणारे काही विदयार्थीच मराठी विषय शिकतात ते पण इतर भाषकांसाठीचे! यामुळे मुलांची मातृभाषा मराठीशी आत्मीयता व आसक्ती कमी होते व स्वत:चीच भाषा बोलणे कमीपणाचे वाटते.

महाराष्ट्र शिक्षण विभागाने विज्ञान व गणित हा विषयांच्या अभ्यासक्रमातील तफावती दुर करुन दोन्ही विषय सीबीएसई समकक्ष/समान केले आहेत.

इतिहास हया विषयाचा आढावा घेतल्यास इयत्ता सातवी ते बारावीच्या अभ्यासक्रमात एकुण २१०० पाने आहेत. यात छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पेशव्यापर्यंतचा इतिहास फक्त दोन पानात आहे. शिवाजी महाराजांच्या पश्चात मोगलाविरुध्द कडवा संघर्ष करुन राष्ट्रासाठी बलीदान देणा—या छत्रपती संभाजी महाराजांचा साधा उल्लेखही नाही. देशात महिलांसाठी पहिली शाळा सुरु करणा—या सावित्रीबाई फुले, आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकांना मदत करुन त्यांच्या उन्नतीसाठी विशेष सवलती प्रथमत: सुरु करणारे शाहू महाराज, महाराष्ट्रातील अनेक थोर संत, समाजसुधारक ,

क्रांतीकारक यांची या अभ्यासक्रमामध्ये दखल घेण्यात आली नाही. संपुर्ण भारतभर भ्रमण करणारे,शिखांच्या गुरु ग्रंथसाहीबमध्ये मानाचे स्थान पटकावणारे व पाच विविध भाषांत अंभग लेखन करणारे थोर संत नामदेव यांचा तर संतपंरपरेच्या धडयात उल्लेखच नाही. मुघल साम्राज्य,अनेक मुघल बादशहा,त्यांचे वजीर,मनसबदार यांचा मात्र सविस्तर इतिहास व माहिती देण्यात आली आहे.

देशातील सामाजिक सुधारणा,स्वातंत्र्य चळवळ,सहकार,कृषी,अध्यात्मिक सतंपरंपरा इ.बाबीचा आढावा घेतलयास महाराष्ट्रातील राजे,योध्दे,स्वातंत्र्यसेनानी,क्रांतीकारक,समाजसुधारक,राजकीय व्यक्ती व संत यांचे कार्य हे नेहमीच पुढारलेले व अग्रेसर असलयाचे दिसून येते.महाराष्ट्राचा हा अभिमानास्पद इतिहास पुढील पिढीपर्यत पोहचवणे आवश्यक आहे.मात्र सीबीएसई पाठयक्रमाचे शिक्षण घेणारे विदयार्थी यापासून वंचित रहातात. एक बाब मात्र दिसुन येते की सीबीएसई पाठयक्रम हा देशभर निरनिराळया राज्यात व्यवसाय/नोकरीनिमित्त वारंवार स्थलांतर करणा—या पालकांच्या मुलांसाठी सोयीचा व उपयुक्त आहे!

- **माती—मायभुमी—मातृभाषा**

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये माती,मायभुमी,मातृभाषा यांना अनन्यसाधारण महत्व आहे. माती जन्म देते.मायभुमी आसरा देते आणि मातृभाषा योग्य असे संस्कार करते.या संस्कारामुळेच प्रत्येक माणसाचे जीवन संपन्न होते.संत ज्ञानेश्वरानी मातृभाषेचे महत्व ओळखले होते.त्यामुळे मराठीतुनच त्यानी ज्ञानाचा प्रसार केला.मराठीविषयी सार्थ अभिमान व्यक्त करताना त्यानी म्हंटलेलें आहे **माझा मराठाचि बोलु कौतुके ! परि अमृतातेही पैजा जिंके ! ऐसी अक्षरे रसिके मेळविन !!**

अनेक संतानी, लेखक, कवीनी आपलया मातृभाषा मराठीचे सांगितलेले महत्व आपण सर्वानी स्मरणात ठेवले पाहिजे आणि मातृभाषा मराठीचे ऋण फेडले पाहिजे.

## पर्याय —

- आता मराठी शाळेमध्ये पहिलीपासुन इंग्रजी विषय शिकवतात.भाषा म्हणुन इंग्रजी विषय शिकण्याची शिक्षणाच्या सुरवातीपासुन मराठी माध्यमातुन सोय विदयार्थ्यांना झाली आहे.
- इंग्रजी संभाषण चांगले येण्यासाठी विदयार्थी थोडे मोठे झाल्यावर मराठी वृत्तपत्रासोबत एखादे इंग्रजी वृत्तपत्र वाचण्याची सवय लावावी.रेडीयो व टिव्ही वरिल इंग्रजी बातम्या विदयार्थ्यांना ऐकण्याची सवय लावावी. यामुळे त्यांचा शब्दसंग्रह समृध्द होवुन इंग्रजी शब्द/भाषा उच्चाराबाबत माहिती मिळेल.उपरोक्त पत्रातले मुददे विदयार्थ्यांना समजावुन सांगावेत व मातृभाषेतील शिक्षण कसे चांगले आहे हे पटवुन दयावे.
- जे विदयार्थी इंग्लीश माध्यमात (विशेषत: केजी ते ४ थीत) आहेत त्यांच्या पालकांनी धाडस करुन लोक,नातेवाईक,मित्रमंडळी काय म्हणतील याचा विचार न करता माध्यम बदलण्याचा निर्णय घेवुन मातृभाषा मराठी माध्यमात शालेय शिक्षण दयावे व मुलांचे शैक्षणिक आयुष्य घडवावे.
- मुलांना सहज आत्मसात होणा—या मातृभाषा मराठी माध्यमातच शालेय शिक्षण देणे व इंग्रजी भाषा म्हणुन शिकवुन मुलांना इंग्रजी भाषा व संभाषणात हुशार करणे हाच शालेय शिक्षणाचा राजमार्ग आहे.

# मातृभाषेच्या माध्यमातुन शालेय शिक्षण — सर्वोत्तम शिक्षण

## माहितीपत्रक पालकापर्यंत प्रभावी प्रसार करण्यासाठी मार्गदर्शक सुचना

सध्या मराठी माध्यमांच्या शाळांतील कमी होत असलेली पटसंख्या हा मोठया चिंतेचा विषय आहे.कोणीतरी काहीतरी करेल अशी अपेक्षा न ठेवता मराठी माध्यमांच्या शाळातील शिक्षकांनीच सक्रिय होण्याची वेळ आता आली आहे. मातृभाषा मराठी माध्यमाचे महत्व पालकांपर्यत पोहोचवणे यासाठी अत्यंत आवश्यक आहे. 'शालेय शिक्षणात मातृभाषा मराठी माध्यमाचे महत्व' हे माहितीपत्रक पालकांचे प्रबोधन करण्यासाठी उपयुक्त व प्रभावी असल्याचे आढळुन आले आले आहे. सर्वसामान्य पालकापर्यंत हे प्रबोधनपर माहितीपत्रक पोहोचण्यासाठी मराठी शाळांतील शिक्षक, विदयार्थी व विदयार्थ्यांचे पालक यांच्या सहभागातुन विशेष उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.

१.मराठी माध्यमांच्या शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व सध्या शाळेत शिकत असलेल्या विदयार्थ्यांच्या पालकांना माहितीपत्रक ईमेलव्दारे अथवा छापील प्रतीव्दारे देणे.
२.पुर्वप्राथमिक,प्राथमिक शाळेतील पालकांना माहितीपत्रक ईमेल अथवा छापील प्रतीव्दारे देवुन माहितीपत्रक त्यांच्या आसपासचे समवयस्क रहिवासी,नातेवाईक यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रेरित करणे.
३.माध्यमिक शाळांतील इयत्ता ७ वी ते ९ वीच्या विदयार्थ्यांचा दिवाळी,नाताळ अथवा उन्हाळयाच्या सुटटीत विशेष उपक्रम आयोजित करावा. या उपक्रमाअंतर्गत माहितीपत्रकाच्या प्रती विदयार्थ्यांमार्फत (प्रत्येकी १० पालक) त्यांच्या रहात्या परिसरातील १ ते ६ वयोगटाचे अपत्ये असलेल्या पालकांपर्यंत पोहोचवाव्यात व संबंधित पालकांचे नावपत्ता,फोन नंबर,ई मेल इ. माहिती प्राप्त करुन संकलित करावी.
४.आपल्या परिचयाच्या इतर मराठी शाळांतील शिक्षकांपर्यंत हे माहितीपत्रक ईमेल अथवा छापील प्रतीव्दारे देवुन त्यांना हा उपक्रम राबविण्यास प्रेरित करणे.
५.शालेय शिक्षणात मातृभाषा मराठी माध्यमाचे महत्व हा विषय सर्वसामान्य पालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'वातावरणनिर्मिती' करणे आवश्यक आहे. यासाठी या पत्रकातील प्रभावी मुददे थोडक्या व मोजक्या शब्दात होर्डीग,फ्लेक्स बोर्ड,भित्तीपत्रके,स्टिकर्स याव्दारे गर्दीचे व महत्वाची ठिकाणे,चौक रेल्वे/बस स्टॅड,शाळेचा दर्शनी भाग,शाळेच्या भिंती याचा वापर करुन प्रसारित केल्यास उपयुक्त होईल. पत्रकातील प्रभावी मजकुर/मुददे फेसबुक, व्हॉटसअप् इ. सोशल मेडीयाव्दारे प्रसारित केल्यास वातावरणनिर्मिती होण्यास नक्कीच मदत होईल.
६. 'शालेय शिक्षणात मातृभाषा मराठी माध्यमाचे महत्व' हे माहितीपत्रक सर्वसामान्य पालकांपर्यत पोहोचवणे हे सध्याच्या परिस्थितीत अंत्यत आवश्यक असे सामाजिक प्रबोधन आहे.सामाजिक प्रबोधन करताना जवळच्या व्यक्ती,नातेवाईक,मित्र यांचेकडुन विरोध अथवा हेटाळणी होण्याचीसुध्दा शक्यता असते. मात्र या विरोधाने नाउमेद न होता वरिल उपक्रम सातत्य ठेवुन विशेष प्रयत्न करुन दरवर्षी राबविला तर सकारात्मक बदल नक्कीच शक्य आहे.

**अधिक माहितीसाठी 'मराठी शाळा आपण टिकवल्या पाहिजेत' या फेसबुक समुहामध्ये सामिल व्हा.**